# प्रकरण दुसरे

# प्रकरण दुसरे.

## १९८० ची सार्वत्रिक निवडणूक व विश्लेषण.

### १. १९८० निवडणूकीची पार्श्वभूमी.

पहिल्या प्रकरणात १९७७ पर्यंत लोकसभेच्या निवडणूकीचा संक्षिप्त आढावा घेण्यात आलेला आहे. १९८० सार्वत्रिक निवडणूकीचे विश्लेषण पार्श्वभूमीवर आधारीत करण्यासाठी १९७७ नंतरची राजकीय घडामोडींची तपशीलाने आढावा घेणे महत्वाचे ठरेल.

१९७५ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांनी आपली सत्ता टिकविण्याच्या दृष्टीने देशामध्ये आणीबाणी आणली या आणीबाणीच्या काळामध्ये देशात हुकूमशाही प्रवृत्ती वाढली. आणीबाणीच्या काळात देशामध्ये विपरित परिस्थिती निर्माण झाली. या आणीबाणीचे अनेक दुष्परिणाम भारतीय जनतेला भोगावे लागले. देशातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडली. व्यक्तीस्वातंत्र्यावर आघात झाले. वृत्तपत्र स्वातंत्र्यावर बंदी आली, अनेक विरोधी पक्षाच्या नेत्यांना तुरुंगात डांबण्यात आले. एकंदरीत श्रीमती इंदिरा गांधींनी राजकीय डावपेचाचा एक भाग म्हणून संपूर्ण देशभर दहशतीचे साम्राज्य निर्माण केले. अशा परिस्थितीतून देशाची सूटका करुन घेण्यासाठी आणि कॉंग्रेस पक्षाला समर्थपणे तोंड देण्यासाठी जनता पक्षाची स्थापना झाली. आपल्या ऐतिहासिक कर्तव्याच्या जाणीवेने समाजवादी पक्ष, संघटना कॉंग्रेस, जनसंघ आणि भारतीय लोकदल हे चार पक्ष मतभेद विसरुन एकत्र आले.[१] १९७७ च्या निवडणूकीत कॉंग्रेस पक्षाच्या हुकूमशाही प्रवृत्तीला विरोध करुन जनता पक्ष सत्तेवर आला. परंतु हा पक्ष अल्पकाळ सत्तेवर राहिला.

अवध्या अडीच वर्षात या पक्षाने आपले लोकसभेतील बहुमत गमावले. सुरवातीच्या काळात जनता पक्षाने मोरारजी देसाई यांना पंतप्रधान म्हणून निवडले आणि त्यांनी देशातील सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थिती योग्य रितीने हाताळण्याचा प्रयत्न केला परंतु या पक्षामध्ये संघर्ष निर्माण झाले. नेतृत्वासाठी स्पर्धा झाल्या. चरणसिंगांनी आपला लोकदलाचा गट वेगळा केला. त्यामुळे जनता पक्ष संसदेत अल्पमतात आला. मोरारजी देसाई यांचे सरकार कोसळले. चरणसिंगांनी आपली पंतप्रधानपदाची महत्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी कॉंग्रेस व इंदिरा गांधींची मदत घेतली आणि चरणसिंग देशाचे नवे पंतप्रधान झाले. परंतु चरणसिंगांचा कार्यकालही अत्यंत अल्प ठरला. अवध्या २३ दिवसात चरणसिंगांचे सरकार कोसळले. अशाप्रकारे १९७७ मध्ये स्थापन झालेल्या जनता सरकारला अपयश आले आणि पुन्हा १९८० मध्ये लोकसभेच्या निवडणूका घ्याव्या लागल्या. १९८० च्या निवडणूकीत जनता पक्षाचा पराभव आणि कॉंग्रेसचे यश अपेक्षित होते. परंतु कॉंग्रेस पक्षाला मिळालेला विजय हा जनता पक्षाच्या अकार्यक्षम कारभारामुळे, अस्थिर धोरणामुळे आणि पक्षातील झालेल्या फूटीमुळे मिळाला. देशातील जनता ही जनता पक्षाकडून फार मोठया आशा बाळगून होती. परंतु हे सरकार जनतेच्या अपेक्षांची पूर्ती करू शकलेले नाही.

जनता पक्षाने सत्ता स्थापन केल्यानंतर १९७८ च्या विधानसभा निवडणूकीत देशाची राजकीय परिस्थिती बरीचशी अस्थिर बनली आणि या काळात जाती जातीतील आणि वर्गावर्गातील संघर्ष वाढले गेले. राजकीय सद्भागाच्या शक्यता वाढल्या व राजकीय परिस्थिती अस्थिर व प्रवाही होऊ लागली. भांडवलदार, व्यापारी व जमिनदार या वर्गाचे प्राबल्य वाढले. राष्ट्रीय भांडवलदारांना मिळणारे सरकारी संरक्षण कमी झाले आणि विविध गटात स्पर्धा वाढली. पराधीन भांडवलदारांनी आयात धोरण शिथिल करण्यासाठी परदेशी तंत्रज्ञान मोठया प्रमाणात आयात करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. जमीनदारवर्गाने जमीनसुधारणा कायद्याच्या अंमलबजावणीस विरोध करून ग्रामीण भागात

जास्त मोठया प्रमाणात गुंतवणूकीची मागणी केली. त्यांना शेती उत्पन्नावर कर नको होता. व्यापाऱ्यांनी व्यापारावरील निर्बंध दूर करण्याचा प्रयत्न सुरु केला, त्याचप्रमाणे मजूरवर्गांनी व इतर सुसंघटीत गटांनी वेतनवृध्दीसाठी संघर्षाला सुरवात केली. चरणसिंग हे स्वत: शेती करणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्यांचे पुढारी, त्यांच्या वर्गात नव्याने जागृत होऊ असलेल्या हरिजनात जमिनीवरुन संघर्ष सुरु झाले. देशाच्या मर्यादीत आर्थिक साधनसामुग्रीवर जास्तीतजास्त नियंत्रण मिळविण्याचा सर्व गट प्रयत्न करु लागले. सरकारच्या एकूण उदार धोरणामुळे थोडयाफार प्रमाणात या काळात स्पर्धात्मक अर्थकारणाची सुरवात झाली.

---

१९७७ च्या निवडणूकीत कॉंग्रेसचा उत्तर भारतात फार मोठा पराभव झाला. दक्षिण भारतात कॉंग्रेसने विजय मिळविला, पण जनता पक्षाचे बळ बरेच वाढले. कॉंग्रेसच्या पराभवाचे कारण म्हणजे तीला या वेळी हरीजन व मुसलमान या दोन जमातींची मते मिळाली नाहीत. त्यानंतर नऊ राज्यात विधानसभेच्या निवडणूका झाल्या. त्यानंतर जनता पक्षातील संघर्ष हळूहळू सुरु झाले. उत्तर भारतात चरणसिंगानी तिकीट वाटप करतांना आतापर्यंत सत्तेपासून दूर असलेल्या पण आर्थिकदृष्टया शक्तीशाली असलेल्या मध्यल्या वर्गातल्या मागासलेल्या वर्गांना जास्त प्रमाणात तिकीटे दिली. उच्चवर्गीयांना फारच थोडया जागा मिळाल्या. मागासवर्गीयांच्या वाढत्या लढावू भूमिकेमुळे हरिजनानी यावेळी कॉंग्रेसला मते दिली. मुसलमान पण विभागले गेले त्यामुळे जनता पक्षाची मते कमी झाली.

या निवडणूकीमध्ये उत्तर भारतात व ओरिसात जनता पक्षाचे सरकार अस्तित्वात आले. पश्चिम बंगालात डाव्या आघाडीचे सरकार अस्तित्वात आले, तर जम्मू-काश्मिर, तामिळनाडू या प्रांतात प्रादेशिक

पक्षांना बहुमत मिळाले. काँग्रेसचा पूर्ण पराभव झाल्यामुळे भारतात पुन्हा एकपक्षीय राजवट स्थापन झाल्याचे काही राज्यशास्त्रज्ञांनी सांगायचास सुरवात केली, पण त्यांच्या हे लक्षात आले नाही की, हरिजन व मुसलमान हे हळूहळू जनता पक्षापासून दूर जात आहेत आणि भारतातील इतर भागात क्षेत्रीय पक्षाची सरकारे स्थापन झाली आहेत. शिवाय इंदिरा गांधींना पण देशात कांहीं भागात पाठिंबा आहे. यावरुन असा निष्कर्ष काढता येतो की, देशामध्ये प्रादेशिक पक्षांचे प्राबल्य वाढत आहे. शिवाय जनता पक्षाचे लोकमत कमी होत आहे.

जनता पक्षात चालू असलेल्या गटबाजीचा फायदा घ्यावा असे काँग्रेस पक्षाचे नेते चव्हाण-रेड्डी यांना वाटले व त्यांनी असा विचार केला की, जनता पक्षातील एका गटाशी हातमिळवणी करुन सत्ता हस्तगत करावी. ही सर्व परिस्थिती पाहिल्यावर इंदिरा गांधींनी देवराज, अरस यांच्या मदतीने पक्ष तोडला आणि इंदिरा काँग्रेसची स्थापना केली. यावेळी इंदिरा गांधीची जनमानसातील प्रतिमा चांगली नव्हती. शहा आयोगाचा अहवाल व वर्तमानपत्रातील टीका यामुळे त्यांच्या पक्षास फारसे भवितव्य नाही असे सर्वांना वाटत होते. परंतु हरियाणातील कर्नाटकच्या पोटनिवडणूकीत जनता पक्षाचा उमेदवार निवडून आला आणि काँग्रेसच्या उमेदवाराला दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली. यावरुन असे सिध्द होते की, उत्तर भारतात चरणसिंगांच्या मागासवर्गीय आघाडी-विरुध्द उच्चवर्णीय व हरिजन मुसलमानांची आघाडी जन्म घेत आहे. दुसरी गोष्ट जनमानसात काँग्रेस पक्षास फारसे स्थान नाही. यावरुन असे दिसते की, जनता पक्षाची लोकप्रीयता हळूहळू कमी होत चालली आहे.

याचे प्रत्यंतर कर्नाटक, आंध्र व महाराष्ट्र या राज्यात झालेल्या निवडणूकीच्या वेळी आले. कर्नाटकात इंदिरा काँग्रेसने जनता पक्षाचा पराभव केला. आंध्रात इंदिरा काँग्रेसला बहुमत मिळाले व महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसचाच विजय झाला. या विजयामुळे भारतात इंदिरा

गांधींचे राजकारणात पुनरागमन झाले. त्यानंतर झालेल्या आझमगड व इतर दोन पोटनिवडणूकांत इंदिरा गांधींच्या पक्षाचा विजय झाला. या सर्व निवडणूकांचा अभ्यास करतांना ही गोष्ट स्पष्ट होते की, इंदिरा गांधींना हरिजन, गिरिजन व मुसलमान जमातींचा मोठा पाठिंबा आहे. जनता पक्ष कॉंग्रेसप्रमाणे या वर्गात आपल्याकडे वळविण्यात असमर्थ ठरला. जनसंघाविषयी दलितांना फारसे आकर्षण नाही.

या जातीसंघर्षाचा जनता पक्षावर प्रभाव पडला कारण भालोदचे मागासवर्गीयांबाबतचे धोरण जनसंघाला मंजूर नव्हते. शिवाय जनसंघाने चरणसिंगांना पाठींबा दिला नाही याचा राग होता. म्हणून जनसंघ व भालोद या घटकात संघर्षास सुरवात झाली आणि त्यामध्ये जनसंघाने भालोदच्या तीनही मुख्यमंत्र्यांना पदच्युत केले. राजनारायण व मधू लिमये यांनी रा. स्व. संघावर हल्ला सुरु केला. पक्षातील या संघर्षामुळे जनमानसातील पक्षाच्या प्रतिमेवर वाईट परिणाम झाला.

मोरारजी देसाई यांच्या सरकारची कामगिरी तशी उल्लेखनीय नव्हती. पक्षात चालू असलेल्या संघर्षाने पडसाद मंत्रिमंडळात उठले. चरणसिंग अर्थमंत्री झाले आणि त्यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकामुळे देशातील सामाजिक संघर्ष जास्त मोठया प्रमाणात वाढले याचे कारण महत्वाच्या जीवनावश्यक वस्तूंच्या भावात वाढ झाली. आणि संघटीत क्षेत्रात आंदोलनास सुरवात झाली. सरकारचा गैरकारभार आणि कामगारांच्या चळवळी यामुळे उर्जा-संकट उभे राहिले. रेल्वेच्या कामकाजावर ह्यामुळे परिणाम झाला. सशस्त्र पोलिसांच्या बंडामुळे सरकार काही करु शकते यावर लोकांचा विश्वास राहिला नाही. मोरारजींच्या सरकारमधील बहुतेक कॅबिनेट मंत्री अकार्यक्षम होते हे सिध्द झाले. सरकारच्या अशाप्रकारच्या अकार्यक्षमतेमुळे सरकारची प्रतिमा जनमानसात खूपच उतरली. पक्षातील विविध घटकांना हा पक्ष आपली पांच वर्षे पूर्ण करेल की नाही याबाबत शंका होती.

चरणसिंग यांनी पक्ष फोडला आणि जनता सरकार कोसळले. राजनारायण यांच्याबरोबर बहुगुणा, लिमये, पटनाईक यांच्यासह जवळजवळ १०० जनता खासदारांनी पक्षांतर करून जनता [एस] ची स्थापना केली. चरणसिंगांबरोबर जनता पक्षातील क्षेत्रीय व ग्रामीण नेतृत्व बाहेर आले होते. त्यात मागासलेल्या पण आर्थिकदृष्टया शक्तीशाली जातीचा भरणा होता. आपण इंदिरा काँग्रेसशिवाय सरकार स्थापन करू असा लिमये यांचा होरा होता पण जगजीवनराम व पूर्वाश्रमीचे प्रजासमाजवादी जनता पक्षात राहिले. चरणसिंगांना काँग्रेसची मदत मिळाली कारण काँग्रेस पक्षात पण क्षेत्रीय व शेतकरी जमातीचे नेतृत्व करणा-या पुढा-यांचे वर्चस्व होते. चरणसिंगांना डाव्या पक्षांचा सुरवातीला पाठिंबा मिळाला पण त्यांच्या पाठिंब्यावर सरकार बनत नव्हते. इंदिरा गांधींनी चरणसिंगांना पाठिंबा जाहिर केला त्यामुळे मार्क्सवादी आघाडीपासून बाजूला राहिले पण उजव्या साम्यवाद्यांनी चरणसिंगांना पाठिंबा दिला. जुलै, १९७९ च्या चौथ्या आठवडयात चौधरी चरणसिंग भारताचे पाचवे प्रधानमंत्री बनले. [२]

जनता पक्षाच्या अपयशात मोरारजी देसाईंचा मोठा वाटा आहे. प्रधानमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांनी पक्षनेतेपदाचा राजीनामा दिला असता तर जगजीवनराम प्रधानमंत्री बनण्याची शक्यता होती पण जनसंघातील कडव्या मंडळींच्या मदतीने ती मागणी फेटाळून लावली. त्यामुळे चरणसिंगांचा मार्ग सुकर झाला कारण मोरारजी देसाई कोणासच पंतप्रधान म्हणून नको होते.

चरणसिंगांनी काँग्रेस [आय] च्या पाठिंब्यावर सरकार स्थापन केल्यानंतर अवघ्या २३ दिवसात इंदिरा गांधींनी चरणसिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला आणि जनता पक्ष अल्पमतात आला. अशाप्रकारे इंदिरा गांधींनी पाठिंबा देऊन जनता पक्षाचा निम्मा पराभव अगोदरच करून ठेवला त्याचबरोबर त्यांनी जेंव्हा पाठिंबा दिला तेंव्हाच त्या

केंव्हाही पाठिंबा काढून घेऊन सरकार पाडणार होत्या. तशाप्रकारे त्यांनी योग्य वातावरण निर्मिती करुन त्यांनी चरणसिंग सरकारचा पाठिंबा काढून राजकीय मुत्सदेगिरी दाखविली, त्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला सामोरे जाण्यास पुन्हा मध्यावधी निवडणूकी शिवाय पर्याय नव्हता आणि या परिस्थितीत जानेवारी, १९८० मध्ये निवडणूका झाल्या. या निवडणूकीचे विश्लेषण वेगवेगळ्या पक्षानी घेतलेली भूमिका अर्थात त्याचे जाहिरनामे तपासणे गरजेचे आहे. त्या दृष्टीकोनातून प्रत्येक पक्षाचा जाहिरनामा पुढे थोडक्या स्वरुपात घेतला आहे.

१९८० ची लोकसभा निवडणूक:

| पक्ष<br>१ | राजकिय धोरण<br>२ | सामाजिक धोरण<br>३ | आर्थिक धोरण<br>४ | परराष्ट्रविषयकधोरण<br>५ |
|---|---|---|---|---|
| काँग्रेस(इ) | (१) संसदीय लोकशाहीवर आधारीत समाजवादी राज्य स्थापन करणे<br>(२) लोकशाही राजकीय रचना यशस्वी-रित्या कार्यान्वित करणे<br>(३) न्याय व समान संधी यावर आधारीत समाजरचना स्थापने<br>(४) धर्मनिष्ट विचार व कर्तव्यात कसूर करणा-याचे मन कठोरे<br>(५) लोकशाही बळकट करणे<br>(६) लोकांचा राजकिय,सामाजिक,आर्थिक कृतीमध्ये सहभाग मिळविण्यासाठी लोकशाही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया मजबूत करणे<br>(७) लोकांना कमी खर्चात न्याय यासाठी योजना<br>(८) देशाची एकता आणि अखंडता या साठी प्रयत्न | (१) धर्मनिरपेक्ष समाज बांधणी साठी सकारात्मक उपाय.<br>(२) अल्पसंख्यांकाचे अधिकार सुरक्षित<br>(३) धर्मनिरपेक्षता वाद बळकट करण्या साठी विघटनवादी शक्तीविरुध्द जाणीव निर्मिती·<br>(४) सामाजिक हिंसा थांबविण्यासाठी शांततादलाची निर्मिती<br>(५) अल्पसंख्यांक आयोग स्थापून त्याला घटनात्मक दर्जा देणे<br>(६) स्त्रियांना राष्ट्रीय विकासात समान संधी<br>(७) शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्यांना सोयी सवलती·<br>(८) निरक्षरतेचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न·<br>(९) ग्रामीण व शहरी लोकांच्या आरोग्याची काळजी | (१) आर्थिक विषमता कमी करण्या साठी मिश्र अर्थ व्यवस्थेचा पुरस्कार<br>(२) व्यक्तिगत व सार्वजनिक उद्योगात वाढ करुन आर्थिक समतोल<br>(३) उत्पादन साधनावर समाजाची मालकी, राष्ट्रीय संपत्तीचे विभाजन,संपत्तीच्या केंद्रीकरणाला आळा·<br>(४) वाहतुकीच्या साधनांचा विकास व आधुनिकीकरण यावर भर·<br>(५) देशापुढील अन्नधान्य आणि परकिय चलनाची समस्या सोडविण्याचा प्रयत्न<br>(६) कर व्यवस्थेची पुर्नरचना<br>(७) शेतीचे आधुनिकीकरण व उत्पादना वर भर<br>(८) ग्रामीण आणि शहरी कामगारांना स्वयंरोजगार यासाठी संधी<br>(९) मागास भागात उद्योगधंद्यांचा विकास | (१) परराष्ट्रांशी मैत्रीचे व सलोख्याचे संबंध प्रस्थापिने<br>(२) आंतरराष्ट्रीय शांततेचा पुरस्कार<br>(३) शस्त्रास्त्र स्पर्धेला प्रतिकार<br>(४) पंचशील तत्वांचा पुरस्कार<br>(५) जागतीक शांततेसाठी राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्ष कमी करणे·<br>(६) वर्णद्वेश, गटबाजीचे राजकारण, सत्ता स्पर्धा, साम्राज्यवाद यापासून अलिप्त· |
| भारतीय लोकदल | (१) स्वच्छ आणि कार्यक्षम प्रशासन | (१) कमाल जमिन धारणान्तर्गत अतिरिक्त जमिन हरिजन-गिरिजनांना वाटप | (१) गांधीजींच्या अन्त्योदयाच्या मार्गाने समाजाची प्रगती | (१) सर्वांबरोबर मैत्रीचे,सलोख्याचे संबंध· |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
| --- | --- | --- | --- | --- |
| | (२) शासनाचा अनावश्यक हस्तक्षेप कमी<br>(३) कायद्याची व्यवस्था परिणामकारक<br>(४) सामाजिक आणि आर्थिक विषमता दूर करणे.<br>(५) भ्रष्टाचार निर्मूलना साठी समितीची स्थापना<br>(६) न्यायालयाच्या दर्जात सुधारणा व अन्यायी भ्रष्टाचारी कायदा रद्द.<br>(७) तुरुंग आणि मुक्त वाता-वरणात नियमुक्ती साठी नियमांक सुधारणा.<br>(८) वृत्तपत्र स्वातंत्र्य व मुलभूत हक्कात समावेश<br>(९) घटनात्मक तरतुदी नुसार लोकमताचा आदर.<br>(१०)राज्यांतर्गत वाद सोडविण्या-साठी कायम स्वरूपी आयोगाची स्थापना. | (२) उद्योगधंद्यामध्ये हरिजन व इतर उपेक्षित घटकांना प्राधान्य<br>(३) सामाजिक सुरक्षिततेसाठी वृद्ध, अपंग,सेवानिवृत्त यांच्यासाठी व्यापक विनियोजना.<br>(४) अन्नदान्यात घट न करता आर्थिक उत्पादन वाढवून विषमता कमी करणे.<br>(५) पिण्याचे शुद्ध पाणी देण्याची तरतूद<br>(६) पर्यावरण सुधारण्यासाठी जंगल लागवड<br>(७) सर्वांना शिक्षणाची संधी उपलब्ध | (२)सर्वांना काम करण्याचा हक्क देण्यात येईल<br>(३) गांधीमार्गाने सत्तेचे व उद्योग धंद्याचे विकेंद्रीकरण<br>(४) जमिन उत्पादनात घट न होता जास्तीतजास्त उत्पादन होणे.<br>(५) शेती व कुटीरधंद्यातून रोजगार निर्मिती.<br>(६) शेतीमालाच्या किंमत निश्चित केली जाईल.<br>(७) लोकांच्या मुलभूत गरजा भागविणे, चैनीच्या व अनावश्यक वस्तूंच्या उत्पादनावर बंधने<br>(८) भाववाढ रोखण्याचा प्रयत्न, नफेखोरी, साठेबाजी याना आळा.<br>(९) प्रत्येक कराचा पाया उत्पन्ना ऐवजी उपभोग केला जाईल. | (२) अलिप्ततावादी धोरणां पुरस्कार<br>(३) आंतरराष्ट्रीय शांतता राखण्याचा प्रयत्न<br>(४) शेजारी राष्ट्रांबरोबर नोकरशहा पडलेले प्रश्न सामंजस्याने सोडवून मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे. |
| जनता पक्ष | (१) सर्व पातळ्यावर लोकशाही राबविली जाईल.<br>(२) ~~[illegible]~~ परिणामकारक आणि स्थिर प्रशासन | (१) संपत्ती व उत्पन्नात स्त्रियांना समानता<br>(२) हुंडाविरोधी कायद्यात दुरुस्ती करुन त्याची कडक अंमलबजावणी | (१) शेती, ग्रामोद्योग विकास यांना नियोजनामध्ये प्राधान्य देणे [illegible]<br>(२) किंमती संतुलन | (१) अलिप्ततावादी धोरणाचा स्विकार<br>(२)परराष्ट्रधोरणाचा पाया साम्राज्यवादास विरोध व लोकशाहीवादी राष्ट्रांशी मैत्री. |

४

| १. | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| | (३) कायद्याचे राज्य प्रस्थापिणे | (३) विधानसभेत व लोकसभेत मागासवर्गीयांना राखीव जागांसाठी घटना दुरुस्ती. | (३) ग्रामीण कामगार संघटनांना मदत | (३) संरक्षणाच्या बाबतीत देशाला स्वावलंबी. |
| | (४) पंतप्रधानाचे अधिकाराचे अधिकार कमी | (४) मुलांचे आरोग्य व बौद्धिक क्षमता वाढविण्याकडे लक्ष | (४) गरीब कुटुंबासाठी अंत्योदय योजनेचा विस्तार | (४) जागतिक शांततेसाठी संयुक्त राष्ट्राच्या ताकतीत वाढ. |
| | (५) कायद्याद्वारे सरकार, मोठे अधिकारी, अध्यक्ष यांना अतिरिक्त अधिकार दिले जाणार नाहीत. | (५) सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांसाठी खास तरतूद | (५) रोजगार हमी योजना दहा वर्षात सर्वदेशात लागू करण्यात येईल. त्याद्वारे प्रत्येक कुटुंबातील किमान एका माणसाला रोजगाराची हमी. | (५) निःशस्त्रीकरणाला पुरस्कार<br>(६) आंतरराष्ट्रीय पातळीवर [illegible] नष्ट करण्याची मोहीम. |
| | (६) राज्यांना जास्त अधिकार दिले जातील | (६) युवकांचे कल्याण व स्त्रियांच्या दर्जात वाढ | (६) पदवीधर बेकारांना बेकारभत्ता | (७) आंतरराष्ट्रीय सहकार्याला चालना. |
| | (७) पंचायत राज्याचे पुनरुज्जीवन | (७) पर्यावरणाची काळजी घेण्यात येईल. | (७) भूमिहीन कारागिरांना पात्र वर्षातून तीन केला बेकारभत्ता | (८) उद्योगधंद्यांच्या विकासासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न. |
| | (८) अशोक मेहता शिफारशींची अंमलबजावणी | (८) दिन, दुबळे, अपंग विशेषाधिकाररहित घटक यांच्यासाठी शिक्षण पद्धतीची पुनर्रचना. | (८) एकात्म ग्रामीण विकासासाठी अंदाजपत्रकामध्ये ४५% वित्तपुरवठा | (९) आंतरराष्ट्रीय देवाण-घेवाण करण्यास सांस्कृतिकदृष्ट्या चालना. |
| | (९) राज्यांचे निवडणूक निधी व पक्षांचे निधी यांच्या हिशोबांची तपासणी. | (९) | (९) आर्थिक केंद्रीकरण, मक्तेदारी कमी केली जाईल. | |
| | (१०) मतदाराची वयोमर्यादा १८वर आणणे. | | (१०) कर व नियंत्रणाच्या माध्यमातून चैनीचा उपभोग कमी केला जाईल. | |
| | (११) वृत्तपत्रांना स्वातंत्र्य देण्यासाठी घटनादुरुस्ती. | | (११) सार्वजनिक व सहकारी क्षेत्राला स्वायत्ततेची हमी. | |
| | | | (१२) शेती व उद्योगातील कामगारांनी किमान वेतनाची हमी. | |
| | | | (१३) नागरी कायद्याची अंमलबजावणी. | |
| मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (CPIM) | (१) हुकूमशाही व अतिरिक्त अधिकार कमी करणे. | (१) सामाजिक सुरक्षिततेसाठी प्रयत्न | (१) राष्ट्राचे नियोजनबद्ध व स्वतंत्र आर्थिक विकास होण्यासाठी साम्राज्यवादी धोरणापासून सुटका | (१) अलिप्ततावादी धोरणाचा स्विकार. |

| १. | २. | ३. | ४. | ५. |
|---|---|---|---|---|
| | (१) लोकशाहीचे रक्षण | (१) मुस्लीम अल्पसंख्यांकांचे अधिकार सुरक्षित ठेवणे. | (१) सार्वजनिक मालकी क्षेत्रात वाढ | (१) परराष्ट्रधोरणाचा पाया साम्राज्यवादास विरोध व समाजवादी राष्ट्रांशी मैत्री. |
| | (२) घटनेतील आणीबाणीचे अधिकार काढून घेणे. | (२) आदिवासी व मागासवर्गीय विकासासाठी प्रयत्न | (२) घटकराज्यांना जास्तीत जास्त आर्थिक स्वायत्तता | (२) साम्राज्यवादाला विरोध करण्याऱ्या तिसऱ्या जगातील राष्ट्रांना पाठींबा |
| | (३) सध्याचे संविधान बदलून निहित स्वार्थाची प्रभुसत्ता नष्ट करुन जनतेची सत्ता प्रस्थापित करणे. | (३) लोकशाही धर्मनिरपेक्ष, शास्त्रीय शिक्षणपद्धती होण्यासाठी मूलभूत बदल. | (३) किंमतीचे कार्यक्षमरित्या नियंत्रण | |
| | (४) राष्ट्रपतींचे विशेषाधिकार रद्द करणे. | (४) माध्यमिक पातळी पर्यंत मुक्त शिक्षणाची व्यवस्था. | (४) जमिन व जिवनावश्यक वस्तु वरील कर रद्द, परकीय मदत बंद करणे. | (३) |
| | (५) लोकांच्या मतांच्या प्रमाणानुसार प्रतिनिधित्व सुरु करणे. | (५) नोकरी व शिक्षणामध्ये इतर मागासवर्गीयांना राखीव जागा. | (५) मोठ्या उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण. | |
| | (६) लोकांचे मुलभूत अधिकार सुरक्षित ठेवणे. | (६) स्त्रियांना समाजात दर्जा प्राप्त करुन देणे. | (६) खाजगी उद्योग धंद्यावर नियंत्रण व सार्वजनिक उद्योगधंद्यात वाढ. | |
| | (७) घटक राज्यांना अधिकार क्षेत्राची हमी. | (७) ग्रामीण भागातील दुर्बल घटकांना स्वायत्तता देण्यासाठी घटनेत तरतूद. | (७) आर्थिक योजना तयार करुन त्याद्वारे विकास व स्वावलंबन. | |
| | (८) जनतेची इच्छा प्रगट करण्याचे साधन म्हणून न्यायपालिके कडे पाहिले जाईल. | | | |
| | (९) काँग्रेसच्या धोरणाला विरोध. | | | |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| भारतीय कम्युनिस्ट पक्ष :- | (१) अध्यक्षीय शासन पद्धती आसर्व नागण्या नाकारणे. | (१) हरिजन व दुर्बल घटकांची प्रश्नांना करून होणारी पिळवणूक थांबविणे | (१) जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्याची हमी. | (१) शांततेचा पुरस्कार, साम्राज्यवादाविरुद्ध लढा दिला जाईल. |
| | (२) निवडणूक पद्धतीत बदल करून प्रमाणाशीर प्रतिनिधीत्वाची पद्धत स्विकारणे. | (२) अस्पृश्यता पाळली जाणार नाही यासाठी कायद्यात तरतूद. | (२) किंमती कमी करून सार्वजनिक वितरण व्यवस्था मजबूत. | (२) द. आफ्रिकेतील रंगभेद नीतीचा विरोध |
| | (३) मतदाराचे वय १८ करणे | (३) प्रत्येकांच्या धार्मिक अधिकारात हस्तक्षेप नाही. | (३) आवश्यक वस्तूंच्या भौतिक साठ्यावर नियंत्रण | (३) पॅलेस्टाईन मुक्ती आंदोलनाला पाठींबा. |
| | (४) कायदेमंडळातील सदस्यांना परत बोलाविण्याचा अधिकार मतदाराला देणे. | (४) मुस्लीम व इतर अल्पसंख्याकांना सुरक्षिततेची हमी. | (४) काळाबाजार, साठेबाजी, नफेखोरी विरुद्ध उपाय योजना | (४) निःशस्त्रीकरणावर भर |
| | (५) घटनेतील अंतर्गत आणीबाणीचा नियम रद्द करणे. | (५) स्त्रियांना समान कामासाठी समान वेतन हमी. | (५) जमिनीवरील व अन्न कर रद्द. | (५) अमेरिकेच्या साम्राज्यवादा विरोध |
| | (६) निवडणूकीतील पैशाच्या वापरावर निर्बंध | (६) मुलांच्या कल्याणाचा कार्यक्रम हाती घेतला जाईल. | (६) संकटकाल परिस्थितीत केंद्राकडून मदत | (६) रशिया व समाजवादी राष्ट्रांना पाठींबा. |
| | (७) राज्याच्या बाबतीत उदारमतवादी धोरणाचा स्विकार. | (७) निरक्षरतेचे उच्चाटन. | (७) घटनेत काम करण्याच्या हक्कांचा समावेश | (७) संपूर्ण प्रभाव वसाहतवाद विरोधी [illegible] |
| | (८) घटनेच्या सहाव्या परिशिष्टात त्रिपुराचा समावेश. | (८) लोकशाही समाजवाद व धर्मनिरपेक्षता यावर आधारीत शिक्षण पद्धती. | (८) लहान उद्योगांना सवलती. | (८) अफगाणीस्तानच्या लोकशाही स्वातंत्र्याला पाठींबा. |
| | (९) केंद्र आणि राज्यसंबंधात पुनर्रचना करून राज्यांना जास्त आर्थिक अधिकार देणे. | | (९) शेतीचा विकास करून रोजगारनिर्मीती. | |
| | (१०) लोकशाही मागणी/सुटणा-या प्रश्नांच्या बाबतीत पोलीस यंत्रणेचा वापर न करणे. | | (१०) ग्रामीण भागासाठी रोजगारहमी योजना | |
| | | | (११) ग्रामीण आणि गरीब लोकांच्यासाठी घरबांधणी कार्यक्रम हाती घेण्यात येईल. | |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| काँग्रेस (यु) | (१) लोकशाही व्यवस्थेत मोकळ्या आणि खुल्या वातावरणात निवडणुका होण्यासाठी प्रयत्न<br>(२) निवडणुकीतील भ्रष्टाचाराला आळा.<br>(३) वृत्तपत्र स्वातंत्र्याचा मूलभूत हक्कात समावेश<br>(४) देशात न्याय आणि कायद्याचे प्रशासन अबाधित केले जाईल.<br>(५) देशांतर्गत प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविणे.<br>(६) ग्रामीण गरीबांना मोफत कायदेविषयक मदत<br>(७) भ्रष्टाचार थांबविण्यासाठी प्रयत्न. | (१) अल्पसंख्यांक मागासवर्गीय जाती जमाती यांना पूर्ण संरक्षण.<br>(२) अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक विकासावर भर.<br>(३) सामाजिक अशांतता दूर करण्यासाठी प्रशासन व राष्ट्रीय एकता समितीची स्थापना.<br>(४) उर्दूला दुय्यम भाषेचा दर्जा.<br>(५) सर्व क्षेत्रात अल्पसंख्यांना नोकरीची संधी.<br>(६) देशाच्या प्रशासकीय, राजकीय, आर्थिक क्षेत्रात स्त्रियांना वाढीव दर्जा. | (१) सार्वजनिक वस्तूंचे उत्पादन वाढविले जाईल.<br>(२) सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक कार्यक्षम<br>(३) कामासाठी धान्य व काम देणाऱ्या तत्त्वांचा अंमल, की ज्यामुळे उत्पन्न व फायदा मिळू शकेल.<br>(४) आर्थिक विकासासाठी सार्वजनिक क्षेत्रात गुंतवणूक.<br>(५) ग्रामीण बेरोजगारांना कामाची हमी.<br>(६) शेतीतून रोजगार निर्मितीकरणावर भर.<br>(७) औद्योगिक क्षेत्रात कामगारांना संधी.<br>(८) झोपडपट्टी निर्मूलन. | (१) अलिप्ततावादाचा स्वीकार.<br>(२) वसाहतवादाविरोधी धोरण.<br>(३) विकसनशील देशांना मदत.<br>(४) सर्वांबरोबर मैत्रीचे संबंध ठेवणे. |

## १९८० लोकसभा निवडणूकींच्या जाहिरनाम्याचे विश्लेषण.

१९८० च्या निवडणूकीची राजकीय, सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी लक्षात घेता मतदार वर्तनावर प्रस्तापित परिस्थितीचा फार मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडला, त्याची परिणीती राजकीय पक्षाच्या यशापयशामध्ये झाली.

### १. राजकीय अस्थिरता.

१९७७ मध्ये अधिकारारुढ झालेले जनता सरकार अवध्या अडीच वर्षात पक्षातील मतभेद, फूटी, पक्षशिस्तीचा अभाव यामुळे कोसळले. १९७७ च्या निवडणूकीसाठी जनता पक्षात विलिन झालेल्या मित्रपक्षांनी सर्वमान्य एक घोषणापत्र स्वीकारण्यात आले असले तरी वैचारिक व भावनिक एकता या पक्षात निर्माण झालीच नाहीं. पक्षाच्या नेतृत्वाबाबत ही त्यांच्यात मतभेद झाले. या जनता पक्षातील अंतर्गत मतभेदामुळे जनता सरकार स्थिर, कार्यक्षम सरकार देऊ शकले नाही. म्हणून या काळात या पक्षाची आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिमा ढासळली.

कायदा आणि सुव्यवस्था राखण्यास हे सरकार अपयशी ठरले. संपूर्ण देशाला आर्थिक, सामाजिक, राजकीय संकटांना तोंड द्यावे लागले. याच काळात राष्ट्राच्या एकतेला धोका निर्माण झाला. केंद्र आणि घटकराज्ये यांच्यातील संबंध अधिक बिघडले. या वरील परिणामामुळे जनता व मित्रपक्षानी आपली विश्वासार्हता गमावली.

दुसऱ्या बाजूस कॉंग्रेस [आय] ने प्रसारित केलेला जाहिरनामा काहीसा परंपरागत प्रणाली होता त्यात नवीन असे काही आढळत नाही. पण तात्कालीन जनमानसास आवश्यक अशी प्रतिमा ही कुशल नेतृत्व, पक्षशिस्त आणि स्थिरता आणि एकता स्थापित करण्याची हमी अशा प्रकारची दिली होती. विरोधी पक्षातील एकवाक्यतेचा अभाव, समान आर्थिक धोरणावर एकत्र येऊन अभ्यास करण्याचा अभाव, विरोधी पक्षाच्या नेतृत्वाचा ग्रामपातळीवरील प्रभावाचा अभाव यामुळे मोठ्या प्रमाणावर बदल संभवला. हा बदल कॉंग्रेस [आय] पक्षास फायद्याचा ठरला.

परिवर्तनीय मतदार गटाच्या संदर्भात वरील राजकीय स्थिती व अधाहने परिणामकारक ठरतात. १९७७ च्या निवडणुकीतील मतदान हे १९८० च्या हे जनता व मित्रपक्षाकडून -+- ८ टक्क्यांनी इतर पक्षाकडे वळले.

२. <u>सामाजिक धोरण</u>

सामाजिक धोरणाचा १९८० च्या निवडणुकीतील मतदारावरील परिणाम पाहतांना प्रत्येक पक्षाचे इतरापेक्षा वेगळेपण विस्ताराने विचारात घेऊ.

धर्मनिरपेक्षता.

धर्मनिरपेक्षता तत्वाचा कॉंग्रेस, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, कॉंग्रेस[यू], जनता पक्ष, भारतीय लोकदल इत्यादी सर्वच पक्षांनी आपल्या जाहिरनाम्यात उघडपणे पुरस्कार केला आहे.

मागासवर्गीय आणि आदिवासी.

मागासवर्गीय व आदिवासींच्या कल्याणाकरीता सर्वच राजकीय पक्षांनी अनुकूलता दाखविलेली आहे. त्यासाठी कॉंग्रेसने सवलती देण्याचे आश्वासन, भारतीय लोकदलाने त्यांच्यासाठी जमिनीचे वाटप, जनता पक्षाने त्यांच्यासाठी अतिरिक्त जमिनीचे वाटप आणि खास तरतूदी करण्याचे आश्वासन, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने सवलती व राखीव जागा, तर भारतीय कम्युनिस्ट पक्षाने पिळवणूक व अस्पृश्यता पाळण्यास बंदी घालण्याचे आश्वासन दिले आहे.

स्त्रिया.

स्त्रियांचा सामाजिक दर्जा आणि विकास व्हावा यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी थोड्याफार फरकाने स्त्रियांचा दर्जा वाढावा व त्यांना राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात समान संधी देण्याची हमी दिली आहे. त्यांनी दिलेली स्त्रियांच्या विकासासाठीची आश्वासने म्हणजेच समानसंधी, संपत्ती व उत्पन्नामध्ये समान संधी, दर्जा प्राप्ती, समान कामासाठी समान वेतन, हुंड्यास विरोध ही काही फरकाने सारखीच आहेत.

आरोग्य.

देशात आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या बाबतीत सुध्दा सर्वच पक्षामध्ये एकमत आढळते, त्यासाठी ग्रामीण व शहरी भागात पिण्याच्या पाण्याच्या सोयी उपलब्ध करणे, जननदर खाली आणणे,

प्राथमिक आरोग्य केंद्राची उभारणी, स्वस्त औषध पुरवठा करणे इत्यादी आश्वासने राजकीय पक्षांनी दिलेली दिसतात. याबाबतीतही राजकीय पक्षामध्ये एकमत असल्याचे आढळते.

सामान्यत: काही अपवाद वगळता सामाजिक जाहिरनाम्यातून सर्व पक्ष दिशेच्या बाबतीत समानता बाळगून आहेत. सामाजिक विकासाबाबत त्यांच्यात ऐक्य आहे. परंतु काही मुद्यांबाबत फरक आढळतो. त्यामुळे सामाजिक दृष्टया एखादा मतदार गटास आकर्षून घेऊन शकेल असे प्रभावी वेगळेपण कोणत्याही राजकीय पक्षाच्या जाहिरनाम्यात दिसून येत नाही.

१९७७ ते १९८० या जनता सरकारच्या राजवटीत सामाजिक असंतोष पसरला होता. मागासवर्गीय जाती जमाती, दुर्बल घटक, अल्पसंख्यांक यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले होते. या असंतोषाच्या संदर्भात जवळजवळ २५० अहवाल आले होते. जातीय तणाव वाढले, धार्मिक दंगली झाल्या, जमशेदपूर, आग्रा, मराठवाडा, कानपूर, मुझफरनगर या ठिकाणी जातीय तणाव होऊन दंगलींची संख्या वाढली. ख्रिश्चन लोकांनी सुध्दा सरकारच्या धोरणाविरुध्द आक्रमक पवित्रा घेतला. थोडक्यात सामाजिक स्वास्थ निर्माण करण्यात जनता सरकार असमर्थ ठरले. त्यामुळे १९८० च्या निवडणूकीत सर्वच राजकीय पक्षांनी सामाजिक स्वास्थ प्रस्थापित करण्याची हमी आपल्या जाहिरनाम्यातून दिली.

३. <u>आर्थिक धोरण</u>

१९८० च्या निवडणूकीसाठी जाहिर केलेल्या घोषणेमध्ये राजकीय पक्षांच्या जाहिरनाम्यातील मुख्य मुद्दा म्हणजे जनता राजवटीत आर्थिक आघाडीवर आलेले अपयश. यामुळे प्रत्येक राजकीय पक्षांनी आर्थिक दृष्टीने

परिणामकारक घोषणा केलेल्या दिसतात. कारण जनता राजवटीमध्ये औद्योगिक उत्पादनात घट झाली. सार्वजनिक क्षेत्र तोटयात आली. देशाला २००० मैलाचा समुद्रकिनारा असूनसुध्दा मीठासारख्या जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा आला. भारताच्या आर्थिक धोरणाचा मुख्य आधार औद्योगिक क्षेत्र होते तेच या राजवटीमध्ये ढासळला. नियोजनामध्ये कार्यक्षमता राहिली नाही. बेकारीची समस्या वाढली. जनता सरकारच्या काळात शेतकरी वर्गात असंतोष पसरला. जनता राजवटीचा फायदा फक्त मध्यम वर्गालाच झाला. सुवर्ण विक्रीसंदर्भात केलेल्या कृतीचा फायदा स्मगलर लोकानांच झाला. अशाप्रकारे आर्थिक धोरणाच्या बाबतीत जनता सरकार अपयशी ठरले, त्यामुळे १९८० च्या निवडणूकीसाठी ही परिस्थिती व आर्थिक सुधारणा करण्याच्या दृष्टीने विविध राजकीय पक्षानी आपल्या जाहिरनाम्यात आर्थिक धोरणाचा अवलंब केला आहे. त्याचा आपण क्रमवार विचार करू.

काँग्रेस –

१९८० च्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी काँग्रेस [आय] पक्षाने घोषित केलेल्या जाहिरनाम्यात आर्थिक विकासाबाबत काही धोरणे स्पष्ट करतांना म्हटले आहे की, या निवडणूकीत काँग्रेसच्या हातात सत्ता आल्यास उद्योगधंद्यांचा पाया मजबूत करण्यात येईल. शेतीचे आधुनिकीकरण त्वरीत विकासासाठी वरखड सोयी पुरविल्या जातील. भविष्यासाठी अन्नधान्याचा साठा करून ठेवला जाईल, परकीय चलनाची तरतूद केली जाईल. १९७५-७६ प्रमाणे किंमती स्थिर ठेवण्यात येतील आणि सार्वजनिक फायद्यात चालतील याची दक्षता घेतली जाईल.

लोकदल –

"भारतीय लोकदलाने आर्थिक सुधारणा करण्याच्या दृष्टीने बचतीचे प्रमाण वाढविण्यावर भर दिला आहे. तसेच आर्थिक विकासासाठी

गांधीवादी अंत्योदय मार्गाचा अवलंब, विकेंद्रीकरणावर भर, कामाचा हक्क, रोजगार निर्मिती, शेतीमालाला किंमत देणे, लोकांच्या मूलभूत गरजा भागविणे, चैनिच्या वस्तूवर प्रतिबंध, भाववाढीस विरोध, प्रत्यक्ष कराचा पायाउउत्पनाऐवजी उपभोगाकडे अशाप्रकारच्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केला आहे.

## जनता पक्ष -

जनता पक्षाने आर्थिक विकासाच्या दृष्टीने आपल्या जाहिरनाम्यात शेती आणि ग्रामीण विकास यांना स्वायत्तेची खात्री देण्याची हमी, किंमती संतुलित ठेवणे, रोजगार हमी योजनेचा विस्तार, पदवीधरांना बेकार भत्ता, ग्रामीण विकासासाठी अंदाजपत्रकात ४५ % वित्तपुरवठा करण्याची हमी, मक्तेदारीवर नियंत्रण, चैनिच्या वस्तूंवर कर स्याने नियंत्रण, सार्वजनिक क्षेत्राला स्वायत्तता, शेती व उद्योगातील कामगारांना किमान वेतनाची हमी इत्यादी धोरणाचा अवलंब जनता पक्षाने केल आहे.

## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष -

आर्थिक विकासासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने जाहिर केलेल्या धोरणामध्ये राष्ट्राचा नियोजनबध्द आणि स्वतंत्र विकास घडवून आणण्यासाठी साम्राज्यवाद्यांच्या मदतीपासून सुटका करणे, सार्वजनिक क्षेत्रात वाढ करणे, किंमतीचे कार्यक्षमरित्या नियंत्रण करणे, जमिनीवरील, जीवनावश्यक वस्तूवरील कर रद्द करणे, परकीय मदत बंद करणे, नियोजनाद्वारे आर्थिक विकास व स्वावलंबण अशाप्रकारची आश्वासने या पक्षाने दिलेली होती.

## भारतीय कम्युनिस्ट पक्ष -

१९८० च्या निवडणूकीसाठी जाहिर केलेल्या जाहिरनाम्यात भारतीय कम्युनिस्ट पक्षाने आर्थिक सुधारणांच्या दृष्टीने अनेक महत्वपूर्ण घोषणा केल्या.

त्यामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्था सुधारली जाईल, साठेबाजी, काळाबाजार यास विरोध, कामाचा हक्क देण्यात येईल, लघुउद्योगांना सवलती, रोजगार हमी योजना व घरबांधणी कार्यक्रम हाती घेणे अशा प्रकारच्या अनेक धोरणांचा पुरस्कार या पक्षाने केला.

काँग्रेस [यू] -

काँग्रेस [यू] पक्षाने आर्थिक विकास झपाट्याने व्हावा यादृष्टीने सार्वजनिक उत्पादनात वाढ, सार्वजनिक क्षेत्रात गुंतवणूक व वाढ, ग्रामीण बेरोजगारांना कामाची हमी, शेतीतून रोजगार निर्मिती यावर भर, झोपडपट्टी निर्मूलन अशाप्रकारच्या तरतुदी आपल्या जाहिरनाम्यात केला केल्या आहेत.

वरील सर्व राजकीय पक्षांच्या जाहिरनाम्यांचा विचार केला असता आर्थिक विकासाच्या बाबतीत सर्वच राजकीय पक्षांच्या धोरणात समानता आढळून येते. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने स्वीकारलेल्या आर्थिक साम्राज्यवाद्यांच्या मदतीतून सुटका व भारतीय लोकदलाची गांधीवादी अर्थव्यवस्थेची भूमिका हे दोन वेगळे भाग आणि जनता पक्षाची बेकारांना बेकार भत्ता देण्याची हमी हे काही वेगळे भाग मतदारांना आकर्षून घेण्यास असमर्थ ठरले.

परंतु काँग्रेस [आय], जनता पक्ष, भारतीय लोकदल यांच्या जाहिरनाम्यातील कर रचनेसंबंधी धोरणे मात्र समाजातील विशिष्ट वर्गासाठी आकर्षक ठरली परंतु निर्वाचन निकाल पाहता हा गट काँग्रेसच्या पाठिशी उभा राहिला असे म्हणता येईल.

४. परराष्ट्रीय धोरण -

१९८० च्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी स्वीकारलेल्या जाहिरनाम्यातील परराष्ट्रीय धोरणाबाबत एकमत आढळते. परराष्ट्रीय धोरणांच्या बाबतीत त्यांच्या मांडणीत फरक दिसतो, परंतु सर्वच पक्षांचा उद्देश मात्र एकच आहे. देशांतर्गत मतदारावर परिणाम होण्याइतपत कोणत्याही पक्षाचे परराष्ट्रीय धोरणात वेगळेपण नसल्यामुळे आपल्याला असे म्हणता येईल की, जाहिरनाम्यातील हे धोरण प्रभावहीन ठरते.

१९८० ची सार्वत्रिक निवडणूक : विश्लेषण :

राज्यवार सांख्यिकी मतदार प्रकार लक्षात घेता आपल्या मतदारात आपल्याला सामान्यतः काही स्तर आढळतात. "मतदार प्रकार" ह्या प्रा. सिरसीकर यांनी उल्लेखिल्याप्रमाणे त्या त्या प्रकारानुसार त्या त्या मतदार वर्गाचा वर्तनाचे स्वरूप काहीसे निश्चित होते.

~~जाहिरनामे, धोरणे व कार्यक्रम यांचा परिणाम लक्षात घेता~~ आपल्याला असे दिसून येते की,

१. मताधिकार न बजावणारे
२. उमेदवारानी प्रभावित मतदार
३. पक्षानी प्रभावित मतदार
४. सामाजिक परिघावरील मतदार
५. अनिर्धिष्ठीत मतदार
६. आदर्श मतदार.

ह्या गटातील गुण असणारा मतदार हा सामान्यतः दृढपणे विशिष्ट मुल्यांशी बांधील असतो. त्यांच्या जाणीवा, श्रध्दा, भावना ह्या त्या-त्या पक्षाशी व नेत्यांशी ठामपणे निगडीत झालेल्या असतात. हे असे का? असे विचारल्यास कदाचित आपल्या भूमिकेचे प्रकट समर्थन करू शकणार नाहीत वा सामाजिक वातावरणात त्यांचा अपरिहार्य प्रभाव पडून त्याचे "मत बनलेले असते".

१९८० च्या निवडणूकीतील राजकीय, सामाजिक, आर्थिक परराष्ट्रीय भूमिका त्या त्या वेळी जाहिर केल्या गेल्या, परंतू वरील प्रकारच्या मतदारास त्या भूमीकाचे अपेक्षित समर्थन केले असले तरी दुसऱ्या पक्षाचा जाहिरनामा युक्त वास्तव असून सुध्दा सामान्यतः त्यांच्या वर्तनात आमणारा बदल आढळत नाही. या मतदार गटांच्या ठायी निवडीबाबत ताठरपणा आढळतो.

१९८० च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये ३९.३ % मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला नाही. ह्यास मतदानाचा अधिकार न बजावणारा गट असे म्हणता येईल. ह्या गटाचे अस्तित्व हे कोणत्याही राजकीय पक्षाचे राजकीय अपयशच होय. हे मतदार राजकीय प्रक्रियेपासून स्वतःस अलिप्त ठेवू इच्छितात. पक्षाचे धोरण, कार्यक्रम, जाहिरनामे त्यांना राजकीय व्यवस्थांतर्गत प्रक्रियेत सहभागी करून घेण्यास असमर्थ ठरतात. म्हणजेच ध्येयधोरण, कार्यक्रम, जाहिरनामे यांचा परिणाम त्यांच्यावर होत नाही.

अवैध मते टाकणारा मतदार प्रा. सिरसीकरांच्या मते केवळ यांत्रिकपणे मतदान करतो. हा मतदार आपल्या मतदानाबाबत निरुत्साही असतो किंवा त्यास औपचारिक प्रक्रियात्मक अज्ञान तरी असते. हा गट एकूण मतदान व निर्वाचन प्रक्रियेमध्ये गौण ठरतो. परिणामांच्या स्वरूपावर त्याच्या अस्तित्वाचा काहीही फरक पडत नाही.

सामाजिक परिघावरील मतदार हा सामाजिक मुख्य प्रवाहापासून दूरचा, निम्न उत्पन्न व सामाजिक दर्जा असलेला असा हा मतदार वर्ग असतो ह्यास राजकीय घटना, पक्षधोरणे, उमेदवार याविषयी जवळ जवळ पूर्ण अज्ञान असते. बहुतेकवेळा त्यांना एखाद्या अभिमाने प्रेरित करून अथवा त्या गटाच्या नायक कारवी प्रभावित करून त्यांचे मतदान घेतले जाते. उदा. पहार समाज, आदिवासी जमात.

आदर्श मतदार हा विशिष्ट विचारप्रणालीने प्रभावित असतो. आपण ह्याच पक्षाची निवड का केली याचे विचारप्रणाली आणि जाहिरनामे या आधारे समर्थन करू शकतात व याच आधारे विशिष्ट पक्षाला विरोध का केला हे ही स्पष्ट करतात. हा गट विशिष्ट पक्षाशी दृढतेने बांधील असतो.[१]

वरील चर्चा केलेले मतदार हे दृढ व काहीसे अपरिवर्तनीय आहेत. त्यांचा पाठिंबा कायमपणे विशिष्ट पक्षास राहिलेला आहे.

सामान्यत: आपणास असे म्हणता येईल की, वैध मतदारांपैकी दर पक्षामागे त्यांची तत्वज्ञान, कार्यक्रम धोरणे मान्य असलेला विशिष्ट गट असतोच.

<u>परिवर्तनशील मतदार</u> आणि <u>गटांनी प्रभावित मतदार</u> ह्या दोहोंच्याबाबत मात्र जाहिरनामे, धोरणे कार्यक्रम यांचा परिणाम होऊन बदल आढळतो.

<u>वरील गटांची निश्चिती -</u>

काँग्रेस  % मतदान  फरक

| | | |
|---|---|---|
| १९७७ | ३४. ५ | १९७७ ते १९८० = + ८ % |
| १९८० | ४२. ४३ | |

१९८० मध्ये ८ % आढळणारा फरक म्हणजे गटानी प्रभावित मतदार होय.

जनता पक्ष  % मतदान  फरक

| | | |
|---|---|---|
| १९७७ | ४४ % | १९७७ ते १९८० = - २६ % |
| १९८० | १८. ५ % | |

इ. स. १९८० मध्ये - २६ % आढळणारा फरक म्हणजे परिवर्तशील किंवा प्रभावित मतदार होय.

भा. क. प.  % मतदान  फरक

| | | |
|---|---|---|
| १९७७ | ४. ९ | १९७७ ते १९८० = - २. ३ |
| १९८० | २. ६ | |

१९८० मधील निवडणूकीत - २. ३ % आढळणारा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा मतदानातील फरक हा परिवर्तनीय किंवा गटप्रभावित मतदार होय.

मा. क. प.  % मतदान  फरक

| | | |
|---|---|---|
| १९७७ | ५. १ | १९७७ ते १९८० = + १ |
| १९८० | ६. १ | |

१९८० मधील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या बाबतीत + १ इतका आढळणारा फरक म्हणजे परिवर्तनीय किंवा गटप्रभावित मतदार होय.

थोडक्यात १९८० च्या निवडणूकीतील राजकीय पक्षांच्या जाहिरनाम्यांचा राजकीय, सामाजिक, आर्थिक व परराष्ट्रीय धोरणांच्या दृष्टीने विचार केला तर जाहिरनाम्यातील राजकीय धोरण हा घटक परिवर्तनीय व हितसंबंधी गटास विशिष्ट पक्षाभिमुख मतदान करण्यास उद्दीप्त करणारा ठरला. सामान्यत: या निवडणूकीतील राजकीय पक्षांनी स्वीकारलेल्या ध्येयधोरण व कार्यक्रमांचा प्रभाव मतदार वर्तनावर कितपत पडला हे जाणून घेण्यासाठी समाजातील विविध स्तरातील लोकांच्या मुलाखती घेतल्या. ह्यावरून असा निष्कर्ष निघतो की, भारतीय मतदारावर कोणत्याही राजकीय पक्षाच्या धोरणाचा प्रभाव दिसून येत नाही. समाजातील मागासवर्गीय व झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना जाहिरनाम्याविषयी पूर्णपणे अज्ञान असलेले दिसते. परंतु मध्यमवर्गीयांना जाहिरनाम्याविषयीची माहिती प्रचार सभा, वृत्तपत्रे आणि प्रसार-माध्यमातून थोड्या फार प्रमाणात मिळालेली दिसते. यावरून असा निष्कर्ष निघतो की, १९८० च्या सार्वत्रिक निवडणूकीत भारतीय मतदारांनी केलेले मतदान हे जाहिरनाम्यातील आदर्श व सुधारणावादी गोष्टींचा विचार करून केलेले नाही तर जनता राजवटीमधील अस्थिर राज्यकारभार आणि त्या सरकारला कायदा व सुव्यवस्था राखण्यात आलेले अपयश यामुळे सत्ताधारी पक्षाच्या विरोधात दिलेला कौल होता.

संदर्भ

१ प्रा. देशपांडे ना. र., प्रा. भोळे भा. ल., भारताचे शासन आणि राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८, पान ५५६.

२ समाजप्रबोधिनी पत्र सप्टेंबर ऑक्टोबर १९७९ पान ३४७.

३ पॉल शारदा, १९८० जनरल इलेक्शन इन इंडिया, असोसिएटेड पब्लिशिंग हाउस, न्यू दिल्ली ५, १९८०, पान १९० ते २०६

४ इबिड पान २०७ ते २३०

५ इबिड पान २४८ ते २५१

६ इबिड पान २८९ ते २९३

७ इबिड पान ३०२ ते ३१०

८ इबिड पान ३१३ ते ३२४

९ प्रा. सिरसीकर व्ही. एम., पॉलिटिकल बिहेव्हीअर इन इंडिया, अ केस स्टडी ऑफ १९६२, जनरल इलेक्शन, बॉम्बे, मनकताला, १९६५.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR